भा. कृ. अनु. प.- केंद्रीय कपास अनुसंधान संस्थान, नागपुर
ICAR-central Institute for Cotton Research, Nagpur
An ISO 9001:2015 Certified Organisation

# कापूस हंगाम २०२६ – २७: साप्ताहिक अकरावा पीक सल्ला
# (कालावधी २७ ऑगस्ट ते ०२ सप्टेंबर २०२६)

## अ. मृदा आरोग्य, अन्नद्रव्य व्यवस्थापन, कीड व रोग व्यवस्थापनाबाबत सर्वसाधारण सूचना

**कापसाचे अधिक उत्पादन मिळण्यासाठी जमिनीचे संतुलित पोषण, योग्य पाणी व्यवस्थापन तसेच कीड व रोगांचे नियमित निरीक्षण करून एकात्मिक पद्धतीने व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे.** पीक वाढीच्या सर्व टप्प्यांमध्ये एकात्मिक पीक व्यवस्थापनाचा अवलंब केल्यास पिकाची वाढ जोमदार होते, उत्पादन खर्चात बचत होते आणि कीड व रोगांमुळे होणारे संभाव्य नुकसान टाळता येते.

### मृदा आरोग्य व अन्नद्रव्य व्यवस्थापन (एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन- INM)

- **प्रमुख अन्नद्रव्यांच (NPK) संतुलित व्यवस्थापन**:
  जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी पीक फेरपालट, सेंद्रिय खतांचा वापर, शेणखत, कंपोस्ट, हिरवळीचे खत वापर ई. तसेच आच्छादन पिकांचा अवलंब करावा. पेरणीपूर्वी मातीची तपासणी करून त्यानुसार रासायनिक खतांचा संतुलित व शिफारशीनुसार वापर करावा.
- **सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर करा:** जस्त, बोरॉन, मँगनीज आणि मॅग्नेशियम यांसारख्या दुय्यम व सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता आढळल्यास आवश्यकतेनुसार लक्ष्यित पर्णीय फवारणीद्वारे ती दूर करावी.

### रोग व्यवस्थापन (एकात्मिक रोग व्यवस्थापन - आयडीएम)

- **प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा अवलंब करा**:
  जमिनीद्वारे पसरणारे तसेच पर्णभागावरील रोगकारकांचे प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी एकात्मिक पीक व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करावा. यामध्ये शेताची योग्य स्वच्छता राखणे, तसेच बियाणे व मृदा प्रक्रियेसाठी जैविक कीटकनाशके (बायोपेस्टिसाइड्स) आणि जैवखते (बायोफर्टिलायझर्स) यांचा वापर करावा. यामुळे पिकांची सशक्त वाढ होण्यास मदत होते व रोगांचा प्रादुर्भाव कमी करण्यास सहाय्य होते.
- **पांनांवरील रोगांचे नियंत्रण:**
  हवेतील आर्द्रता जास्त असलेल्या कालावधीत शेताची नियमित पाहणी करावी. रोगाच्या जलद वाढीस व प्रसारास अनुकूल हवामान परिस्थिती असल्यासच शिफारशीनुसार बुरशीनाशकांचा विवेकपूर्ण वापर करावा.

### कीड व्यवस्थापन (एकात्मिक कीड व्यवस्थापन - आयपीएम)

- **नियमित शेत पाहणी करा:** फुलकिडे, मावा, तुडतुडे, लाल कोळी यांसारख्या रसशोषक किडी तसेच बोंडअळींच्या प्रादुर्भावावर लक्ष ठेवण्यासाठी दर आठवड्याला शेताची नियमित पाहणी करावी.

- **सापळे व जैविक कीडनाशकांचा वापर करा:** हंगामाच्या सुरुवातीपासूनच प्रौढ पतंगांच्या हालचालींचे निरीक्षण व अंडी घालण्याच्या कालावधीचा अंदाज घेण्यासाठी फेरोमोन सापळे लावावेत. तसेच कीड व्यवस्थापनासाठी प्रथम प्राधान्याने सेंद्रिय, नैसर्गिक किंवा वनस्पतीजन्य कीडनाशकांचा वापर करावा.
- **नैसर्गिक शत्रू कीटकांचे संवर्धन करा:** लेडीबर्ड भुंगेरे, लेसविंग आणि बिग-आयड बग यांसारख्या उपयुक्त मित्रकिडींचे संवर्धन करण्यासाठी व्यापक परिणाम करणाऱ्या कीटकनाशकांऐवजी निवडक कीटकनाशकांची निवड करावी.
- **रासायनिक कीटकनाशकांचा मर्यादित वापर करा:** रासायनिक कीटकनाशकांचा वापर हा शेवटचा पर्याय म्हणूनच करावा किडींची संख्या आर्थिक नुकसान पातळी गाठल्यानंतरच लेबलवरील शिफारशीनुसार योग्य रासायनिक कीटकनाशकांचा वापर करावा.

## बी. स्थानविशिष्ट कृषी सल्ला

| महाराष्ट्र | | मागील आठवड्यातील प्रत्यक्ष पाऊस | | | | | | | मागील आठवड्यातील प्रत्यक्ष पाऊस | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ऑगस्ट | | | | | | | ऑगस्ट | | | | |
| | | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |
| | धुळे | | | | | | | | | | | | |
| | नंदुरबार | | | | | | | | 3.6 | 4.2 | 0.4 | 0.4 | 0.4 |
| | जळगाव | | | | | | | | 3.6 | 4.5 | 0.8 | 0.8 | 1.5 |
| | अहमदनगर | 6 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 4.7 | 7 | 0.6 | 0.3 | 0.3 |
| | औरंगाबाद | 0.1 | 0 | 0 | 0 | 2.7 | 0 | 0 | 1 | 1 | 0.8 | 0.8 | 0.8 |
|  | जालना | 3.2 | 0.4 | 2.8 | 0 | 0.4 | 0.7 | 1 | 3.8 | 3.6 | 0.5 | 0.3 | 0.4 |
| | बीड | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 5.2 | 3.2 | 0.4 | 0.2 | 0.4 |
| | नांदेड | | | | | | | | 1.6 | 0.9 | 0.3 | 0.2 | 0.5 |
| | परभणी | | | | | | | | 4.4 | 4.6 | 1.8 | 1.6 | 0.4 |
| | हिंगोली | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 5 | 0 | 4.9 | 3.7 | 0.7 | 0.4 | 0.2 |
| | बुलढाणा | | | | | | | | 5.2 | 3.9 | 1.5 | 0.5 | 0.3 |
| | अकोला | 0 | 4 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 6 | 5.5 | 3.2 | 0.3 | 0.2 |
| | वाशीम | 1 | 0.1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 6.7 | 5.1 | 7.5 | 0.2 | 0.3 |
| | अमरावती | 0.8 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 4.3 | 4.4 | 4 | 0.5 | 0.4 |
| | यवतमाळ | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 12 | 8.1 | 8.8 | 1.6 | 0.3 |
| | वर्धा | 2 | 0 | 0 | 0 | 4 | 0 | 0 | 4.1 | 4.7 | 6.2 | 2.4 | 0.5 |
| | नागपूर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 11.2 | 1 | 8.9 | 7.2 | 6.1 | 3.3 | 0.2 |
| | चंद्रपूर | 0 | 0 | 0.5 | 0 | 12.5 | 2.2 | 3.5 | 10 | 14 | 8.3 | 5 | 0.5 |
| पावसाचे प्रमाण आणि रंग कोड | | 0.1 to 2.4 मिमी | | 2.5 to 15.5 मिमी | | 15.6 to 64.4 मिमी | | | 64.5 to 115.5 मिमी | | | 115.6 to 204.4 मिमी | |
| पावसाची श्रेणी | | खूप हलका पाऊस | | तुरळक पाऊस | | मध्यम स्वरूपाचा पाऊस | | | मुसळधार पाऊस | | | अति मुसळधार पाऊस | |

**पीक परिस्थिती:**

अकोला येथे पेरणी केलेले कापूस पीक ५० ते ५५ दिवसांचे असून सध्या शाखिय वाढीच्या अवस्थेत आहे. कोळपणी व निंदणीची कामे करण्यात आली आहेत. तणांचा प्रादुर्भाव असलेल्या शेतांमध्ये तणनाशकांची फवारणीही सुरू आहे. काही शेतांमध्ये विशेषतः लव्हाळा या गवतवर्गीय तणाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात दिसून येत असून, त्यासोबत काही रुंद पानांच्या तणांचाही प्रादुर्भाव आढळून आला आहे. काही कापूस शेतांमध्ये केना या तणाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव दिसून येत आहे. काही शेतांमध्ये रसशोषक किडींचा प्रादुर्भाव आढळून आला; मात्र त्यांची संख्या आर्थिक नुकसान पातळीपेक्षा कमी आहे.

ICAR-CICR, नागपूर येथील शास्त्रज्ञांच्या पथकाने नुकत्याच केलेल्या पाहणीमध्ये बुलढाणा व अकोला जिल्ह्यांतील काही भागांमध्ये दीर्घकाळ पडलेल्या पावसाच्या खंडामुळे व त्यासोबत निर्माण झालेल्या जमिनीतील ओलाव्याच्या ताणामुळे कापूस पिकामध्ये मर रोग व मुळकुज रोगाचा तीव्र प्रादुर्भाव आढळून आला आहे.

राहुरी येथे पेरणी केलेले सिंचनाखालील कापूस पीक पेरणीच्या कालावधीनुसार ५० ते ८५ दिवसांचे असून सध्या पातेधारणा, फुलोरा व बोंड विकासाच्या अवस्थेत आहे. पिकास सिंचन देणे, कोळपणी, निंदणी, फवारणी तसेच खतांचा वापर करण्यात आला आहे. शेतामध्ये पार्थेनियम, हरळी, लव्हाळा, दुधी, केना, नागरमोथा, चांदवेल इत्यादी तणांचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. अनेक शेतांमध्ये रसशोषक किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा अधिक आढळून आला आहे. मायलोसेरस भुंगेऱ्यामुळे १–२ टक्के कापूस झाडांचे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी पाहणीदरम्यान बोंडअळी व तंबाखू स्ट्रीक विषाणू यांचा प्रादुर्भाव आढळून आलेला नाही.

नांदेड येथे पेरणी केलेले कापूस पीक ४६ ते ७१ दिवसांचे असून सध्या पातेधारणा ते बोंडधारणा अवस्थेत आहे. आंतरमशागत, निंदणी, खतांचा वापर तसेच कीड व रोग व्यवस्थापनाच्या उपाययोजना सुरू आहेत. शेतामध्ये द्विदली गवत, सांवा, कोंदळ यांसारख्या गवतवर्गीय तणांचा, तसेच चवळी, घोळ, चाकवत, हिरवी वेल, पार्थेनियम, हिरनखुरी, पुनर्नवा यांसारख्या रुंद पानांच्या तणांचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. तसेच हरळी व लव्हाळा या तृणवर्गीय तणांचाही प्रादुर्भाव दिसून आला आहे. तुडतुडे व मावा यांचा प्रादुर्भाव आढळून आला असला तरी त्यांची संख्या आर्थिक नुकसान पातळीपेक्षा कमी आहे.

**पीकसल्ला:**

अकोला येथे शेतकऱ्यांनी पेरणीनंतर ४५–५० दिवसांनी जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी कापूस शेतात सऱ्या पाडाव्यात. कापूस पिकामध्ये कोळपणी व निंदणीसारखी आंतरमशागतीची कामे करावीत. जमिनीत पुरेसा ओलावा असल्यामुळे हाताने निंदणी करणे शक्य नसल्यास, तणांच्या प्रादुर्भावानुसार तणनाशकांचा वापर करावा. गवतवर्गीय तणांसाठी क्विझालोफॉप इथाइल ५% ईसी @ २ मिली प्रति लिटर पाणी, रुंद पानांच्या तणांसाठी पायरिथिओबॅक सोडियम १०% ईसी @ १.५ मिली प्रति लिटर पाणी किंवा गवतवर्गीय व रुंद पानांच्या दोन्ही प्रकारच्या तणांच्या नियंत्रणासाठी पायरिथिओबॅक सोडियम ६% + क्विझालोफॉप इथाइल ४% एमईसी @ २–२.५ मिली प्रति लिटर पाणी यापैकी योग्य तणनाशकाची फवारणी करावी. सिंचनाखालील संकरित कापूस पिकासाठी रासायनिक खताचा पहिला हप्ता ४० किलो नत्र (९० किलो युरिया प्रति हेक्टर), तर कोरडवाहू संकरित/हिरसुटम कापूस पिकासाठी ४५ किलो नत्र (९७ किलो युरिया प्रति हेक्टर) आंतरमशागत खताच्या स्वरूपात वरखत म्हणून द्यावे. मावा, तुडतुडे व फुलकिडे यांसारख्या रसशोषक किडींच्या नियंत्रणासाठी एनएसकेई ५% + कडुनिंब तेल ५ मिली प्रति लिटर पाणी किंवा कडुनिंब तेलावर आधारित ३०० किंवा १५०० पीपीएम द्रावण ५ मिली प्रति लिटर पाणी + १ ग्रॅम कपडे धुण्याची डिटर्जंट पावडर यांचे मिश्रण फवारावे. तसेच कापसाच्या पाते/फुलांवर गुलाबी बोंडअळीच्या मादी पतंगांना अंडी घालण्यापासून परावृत्त करण्यासाठीही याचा उपयोग होतो. गुलाबी बोंडअळीच्या निरीक्षणासाठी प्रत्येक एकरात २ कामगंध सापळे लावावेत. कापूस पिकातील किडींच्या प्रादुर्भावाचे प्रतिनिधिक निरीक्षण करण्यासाठी प्रति एकर २० झाडांचे नियमित निरीक्षण करावे. पॅरावील्ट ची लक्षणे आढळल्यास लक्षणे दिसू लागताच, कॉपर ऑक्सीक्लोराइड ५०% डब्ल्यूपी @ २५० ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५०% डब्ल्यूपी @ १०० ग्रॅम + युरिया २ किलो प्रति १०० लिटर पाणी या द्रावणाची झाडाच्या मुळाशी आळवणी करावी. अशी आळवणी एक आठवड्याच्या अंतराने २–३ वेळा करावी.

फ्युजेरियम मर रोग व मायक्रोफोमिना मुळकुज रोग प्रभावित क्षेत्रातील शेतकऱ्यांनी रोगग्रस्त झाडे मुळासकट उपटून त्वरित नष्ट करावीत, जेणेकरून रोगाचा पुढील प्रसार रोखता येईल. रोगाचा प्रादुर्भाव पुढे होऊ नये यासाठी रोगग्रस्त झाडांच्या आजूबाजूच्या झाडांना कार्बेन्डाझिम ५०% डब्ल्यूपी @ १.२ ग्रॅम प्रति लिटर पाणी या द्रावणाची आळवणी करावी. त्यानंतर १५ दिवसांच्या अंतराने ट्रायकोडर्मा हार्झियानम किंवा ट्रायकोडर्मा व्हिरीडी @ ५ ग्रॅम प्रति लिटर पाणी या जैविक बुरशीनाशकाची झाडांच्या मुळाशी आळवणी दोन वेळा करावी.

राहुरी येथे शेतकऱ्यांनी पेरणीनंतर ६० दिवसांनी रासायनिक खताचा दुसरा हप्ता द्यावा. कापूस पीक तणविरहित ठेवण्यासाठी हाताने कोळपणी अथवा ट्रॅक्टर/बैलचलित अवजारांच्या साहाय्याने आंतरमशागत करावी. तंबाखू स्ट्रीक विषाणू व फुलकिडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी शेतातील तसेच बांधावरील पार्थेनियम (गाजर गवत) तण काढून नष्ट करावे. जमिनीत पुरेसा ओलावा असल्यामुळे हाताने निंदणी करणे शक्य नसल्यास, गवतवर्गीय तणांसाठी क्विझालोफॉप इथाइल ५% ईसी @ २ मिली प्रति लिटर पाणी, रुंद पानांच्या तणांसाठी पायरिथिओबॅक सोडियम १०% ईसी @ १.५ मिली प्रति लिटर पाणी

किंवा गवतवर्गीय व रुंद पानांच्या दोन्ही प्रकारच्या तणांच्या नियंत्रणासाठी पायरिथिओबॅक सोडियम ६% + क्विझालोफॉप इथाइल ४% एमईसी @ २–२.५ मिली प्रति लिटर पाणी यापैकी योग्य तणनाशकाची फवारणी करावी. रसशोषक किडींच्या प्रादुर्भावावर नियंत्रण ठेवण्यासाठी नियमितपणे शेताची पाहणी करावी. पिवळे चिकट सापळे लावावेत तसेच घरगुती कडुनिंबाच्या बियांचा अर्क (एनएसकेई) ५% किंवा अ‍ॅझाडिरॅक्टिन १०,००० पीपीएम @ १० मिली प्रति १० लिटर पाणी यांची फवारणी करावी. ६० दिवसांपेक्षा जास्त वयाच्या कापूस पिकात रसशोषक किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा जास्त असल्यास, फ्लोनिकामिड ५० डबल्युजी @ २ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी किंवा ब्युप्रोफेझिन २५ एससी @ २० मिली प्रति १० लिटर पाणी यापैकी योग्य कीटकनाशकाची फवारणी करावी. गुलाबी बोंडअळीच्या निरीक्षणासाठी प्रति हेक्टर ५ कामगंध सापळे लावावेत. गुलाबी बोंडअळीची पुढील पिढी होऊ नये यासाठी नियमित अंतराने गुलाबी बोंडअळीच्या अळीसह डोमकळी (रोझेट फुले) गोळा करून नष्ट करावीत. उच्च घनता लागवड पद्धतीने ९० × १५ सेंमी किंवा जवळच्या अंतरावर ९० × ३० सेंमी लागवड केलेल्या कापूस पिकात वाढ नियंत्रित करण्यासाठी मेपिक्वाट क्लोराइड ५% एएस @ १ मिली प्रति लिटर पाणी या वाढ नियंत्रकाची पहिली फवारणी पेरणीनंतर ४०–४५ दिवसांनी किंवा पातेधारणा सुरू होताना करावी आणि त्यानंतर १५–२० दिवसांनी @ १ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात दुसरी फवारणी करावी. ९० × ३० सेंमी अंतरावर लागवड केलेल्या कापूस पिकात पीजीआर ची फवारणी करावयाची नसल्यास, पेरणीनंतर ४५ दिवसांनी मोनोपोडिया (निरुपयोगी/एकेरी फांद्या) काढून टाकाव्यात आणि ७५–८० दिवसांनी शेंडाछाटणी करावी. पॅरावील्ट ची लक्षणे आढळल्यास लक्षणे दिसताच कॉपर ऑक्सीक्लोराइड ५०% डब्ल्यूपी @ २५० ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५०% डब्ल्यूपी @ १०० ग्रॅम + युरिया २ किलो प्रति १०० लिटर पाणी या द्रावणाची झाडांच्या मुळाशी आळवणी करावी. ही आळवणी एक आठवड्याच्या अंतराने २–३ वेळा करावी. तंबाखू स्ट्रीक विषाणू रोगाचा प्रसार टाळण्यासाठी पिकाचे नियमित निरीक्षण करावे. फुलकिडींच्या निरीक्षणासाठी प्रति हेक्टर २० निळे चिकट सापळे लावावेत, तर नियंत्रणासाठी प्रति हेक्टर १०० निळे चिकट सापळे लावावेत. टीएसव्ही बाधित झाडे मुळासकट उपटून नष्ट करावीत, जेणेकरून रोगाचा प्रसार होणार नाही. तसेच शेत व शेताभोवती स्वच्छता राखणे, विशेषतः कापूस शेतातील व आजूबाजूच्या पार्थेनियम (गाजर गवत) तणाचे निर्मूलन करणे आणि फुलकिडींच्या व्यवस्थापनासाठी शिफारस केलेल्या उपाययोजनांचा काटेकोरपणे अवलंब करावा. फुलकिडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा जास्त असल्यास शिफारस केलेल्या कीटकनाशकांचा वापर करून त्यांचे प्रभावी व्यवस्थापन करावे.

नांदेड येथे शेतकऱ्यांनी तणांच्या व्यवस्थापनासाठी आंतरमशागत व निंदणीची कामे करावीत. जमिनीत पुरेसा ओलावा असल्यामुळे हाताने निंदणी करणे शक्य नसल्यास, गवतवर्गीय तणांचा प्रादुर्भाव असल्यास क्विझालोफॉप इथाइल ५% ईसी @ २ मिली प्रति लिटर पाणी, रुंद पानांच्या तणांसाठी पायरिथिओबॅक सोडियम १०% ईसी @ १.५ मिली प्रति लिटर पाणी किंवा गवतवर्गीय व रुंद पानांच्या दोन्ही प्रकारच्या तणांच्या नियंत्रणासाठी पायरिथिओबॅक सोडियम ६% + क्विझालोफॉप इथाइल ४% एमईसी @ २–२.५ मिली प्रति लिटर पाणी यापैकी योग्य तणनाशकाची फवारणी करावी. सिंचनाखालील कापूस पिकास पेरणीनंतर ६० दिवसांनी हेक्टरी ६० किलो नत्र वरखत म्हणून द्यावे, तर कोरडवाहू कापूस पिकास ३० दिवसांनी हेक्टरी ४८ किलो नत्र खताच्या पट्टी पद्धतीने किंवा वर्तुळाकार पद्धतीने द्यावे. युरियाची पसरून फेकून देण्याची पद्धत (ब्रॉडकास्टिंग) टाळावी. उच्च घनता लागवड पद्धतीने (HDPS) तसेच जवळच्या अंतरावर लागवड केलेल्या बीटी कापूस पिकात पातेधारणा अवस्थेत वाढ नियंत्रित करण्यासाठी मेपिक्वाट क्लोराइड ५% @ ५०० मिली प्रति हेक्टर या वाढरोधकाची फवारणी करावी. पेरणीनंतर ३० दिवसांनी रसशोषक किडींच्या व्यवस्थापनासाठी एनएसकेई ५% ची पर्णीय फवारणी करावी. ६० दिवसांपेक्षा जास्त वयाच्या कापूस पिकात रसशोषक किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा जास्त झाल्यास, ब्युप्रोफेझिन २० एससी @ १००० मिली प्रति हेक्टर किंवा डिनोटेफ्युरॉन २० एसजी @ १५० ग्रॅम प्रति हेक्टर यापैकी योग्य कीटकनाशकाची पर्णीय फवारणी करावी. फुलकिडींची संख्या वाढू नये तसेच तंबाखू स्ट्रीक विषाणू (TSV) रोगाचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी शेत व शेताचे बांध तणमुक्त ठेवावेत आणि शेतात व शेताभोवती पार्थेनियम (गाजर गवत) तण काढून टाकावे. पॅरावील्ट आढळल्यास लक्षणे दिसताच कॉपर ऑक्सीक्लोराइड ५०% डबल्युपी @ २५० ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५०% डबल्युपी @ १०० ग्रॅम + युरिया २ किलो प्रति १०० लिटर पाणी या द्रावणाची झाडांच्या मुळाशी आळवणी करावी. ही प्रक्रिया एक आठवड्याच्या अंतराने २–३ वेळा करावी. पानांवरील ठिपके व बोंडसड यांच्या व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझिम १२% + मॅन्कोझेब ६३% डबल्युपी @ ३० ग्रॅम किंवा प्रोपिकोनाझोल २५% ईसी @ १० मिली किंवा अ‍ॅझॉक्सिस्ट्रोबिन १८.२% डबल्यु/डबल्यु + डिफेनोकोनाझोल ११.४%

डबल्यु/डबल्यु एससी @ १० मिली किंवा फ्लक्सापायरॉक्सॅड १६७ ग्रॅम/लिटर + पायराक्लोस्ट्रोबिन ३३३ ग्रॅम/लिटर एससी @ ६ मिली प्रति १० लिटर पाणी यापैकी योग्य बुरशीनाशकाची फवारणी करावी.

The detailed information regarding cotton production technology, e.g., selection of soil, varieties, fertilizer application, sowing methods, irrigation systems, management of weeds, insect pests and diseases, etc., can be availed from an Android-based **CICR Cotton App** developed by ICAR-CICR, Nagpur. The app can be downloaded free of cost from Google Play Store. Additionally, the crop growth stage-specific and weather-based weekly advisories are uploaded on the website of ICAR-CICR (https://cicr.org.in/resource-weekly-advisory) also to be consulted for the benefit of farmers.

**Advisory issued by:**
**Dr. Vijay N. Waghmare**
Director, ICAR-Central Institute for Cotton Research, Nagpur

**Compilation by** Dr. Isabella Agarwal

**Editing Team:**

| | | | |
|---|---|---|---|
| Dr. G. T. Behere | Dr. A. S. Tayade | Dr. A. H. Prakash | Dr. S.K. Verma |
| Dr. S.K. Sain | Dr. Rishi Kumar | Dr. Babasaheb B. Fand | Dr. Ramkrushna GI |
| Dr. S.P Gawande | Dr. Shivaj Thube | Dr. R.R. Chapke | |

**Regional language translation**:
**Hindi** : Mr Ghanshyam Deogirikar & Mr Ashutosh Mishra
**Punjabi** : Dr Amarpreet Singh
**Tamil** : Dr. A. Manikandan & Dr. M Saravanan
**Telugu** : Dr L. Rajesh Chaudhary
**Marathi** : Dr Vrushali Deshmukh & Mrs Pooja Ghonge
**Gujrati** : Dr H R. Desai & Dr Vivek Shah
**Oriya** : Dr B. S. Nayak
**Kannada** : Dr Neelkanth Hiremani